**MHKO100013422016**

## आदेश निशाणी क्र.२८
(रंगराव भोईटे वि. बाळू कदम )

दरखास्तदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २६ नियम ९ प्रमाणे कोर्ट कमिशनर नियुक्तीकरीता दाखल केला आहे.

२. अर्ज वाचला. वि.प. यांनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले नाही. दरखास्तदार तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

३. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले. दरखास्तदार व वि.प. यांच्या दरम्यान रे.क.क्र.७९/२०११ मध्ये तडजोड होवून वि.प. यांना गट क्र.५५८ मधील पुर्व-उत्तर कोप-यात १.५ आर क्षेत्र म्हणजेच दक्षिण-उत्तर ११.५४ चौ.मी. व पुर्व-पश्चिम १३ चौ.मी. असे क्षेत्र देण्यात आलेले होते. त्याप्रमाणे दरखास्तदार यांनी मोजणी करून सिमेंटचे पोल हद्दीवर रोवून घेतले होते. तथापि वि.प. यांनी अतिक्रमण करण्याचे उद्देशाने ते पोली उपडून काढले आहेत. त्याकरीता दावा मिळकतीची मोजणी होवून वि.प. यांनी अतिक्रमण केले आहे का व हद्दीवरील सिमेंटचे पोल उकडून टाकले आहेत का याची प्रत्यक्ष पाहणी करण्याकरीता न्यायालयीन आयुक्त यांची नियुक्ती व्हावी म्हणून अर्ज दाखल केला आहे.

४. निशाणी ०७ वर दाखल केलेल्या आदेशानुसार न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार दावा मिळकतीची मोजणी होवून त्यांनी तसा अहवाल व नकाशा अभिलेखावर दाखल केला आहे. परंतु ती मोजणी

न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार झाली नाही म्हणून दरखास्तदार यांनी पुन्हा मोजणी होण्यासाठी निशाणी २३ वर अर्ज दाखल केला. त्यावरील आदेशानुसार तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी पुन्हा दावा मिळकतीची मोजणी करून तसा अहवाल अभिलेखावर दाखल केला आहे. ती मोजणी योग्यरितीने झाली नाही म्हणून जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, कोल्हापूर यांची नियुक्ती न्यायालयीन आयुक्त म्हणून करून दावा मिळकतीची मोजणी पुन्हा करावी याकरीता सदर अर्ज दरखास्तदार यांनी दाखल केला आहे.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता दरखास्तदार यांनी रे.क.क्र.७९/२०११ हा दावा कब्जा मागणीकरीता दाखल केला होता. त्यामध्ये दरखास्तदार व वि.प. यांच्यामध्ये तडजोड होवून गट क्र.५५८ मधील पुर्व-उत्तर कोप-यातील १.५ आर क्षेत्र वि.प.यांना देण्यात आले होते व उर्वरीत ४१.६ आर क्षेत्र दरखास्तदार यांना देण्यात आले होते. सदर दरखास्त वि.प.हे दरखास्तदार यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत करून न्यायालयाच्या आदेशाचा भंग करत आहेत याकरीता वि.प. यांना दिवाणी तुरूंगात ठेवण्याकरीता तसेच त्यांची स्थावर/जंगम मालमत्ता जप्त करून विक्री करण्याकरीता दाखल केली आहे.

६. यापुर्वी दरखास्तदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक होवून दोन वेळा दावा मिळकतीची मोजणी झाली आहे. त्याबाबतचे अहवालाचे व त्यासोबतच्या नकाशाचे मी अवलोकन केले. त्यानुसार दावा मिळकतीवरील वस्तुस्थिती अभिलेखावर आली आहे. त्यामुळे पुन्हा न्यायालयीन आयुक्त नेमण्याची गरज नाही.

७. दरखास्तदार यांनी वि.प. हे त्यांच्या कब्जेवहिवाटीस हरकत अडथळा करत आहेत हे पुरावा देवून सिद्ध करावे. तसे झाल्यास दरखास्तदार

यांनी मागणी केलेली दाद देता येईल. त्यामुळे दरखास्तदार यांनी त्याबाबत पुढील स्टेप्स घ्याव्यात. सदर दरखास्त निकाली काढण्यासाठी आता पुन्हा न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूक करणे गरजेचे नाही. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**आ दे श**

अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.10.01 17:27:59 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक – ०१/१०/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज